# पुण्यातील बांधकामांवर बंदी घालण्याचा इशारा

सकाळ पुणे २१-०८-१५

## कचरा व्यवस्थापनाबाबत उच्च न्यायालय संतप्त

**मुंबई, ता. २० :** कचरा व्यवस्थापनाच्या नियमांचे काटेकोर पालन पुणे महापालिकेने केले नाही, तर कल्याण-डोंबिवलीप्रमाणे पुण्यातील बांधकामांवरही बंदी घालावी लागेल, असा तोंडी इशारा उच्च न्यायालयाने गुरुवारी दिला.

या विषयावर विनित धांडा यांनी सादर केलेल्या जनहित याचिकेच्या सुनावणीदरम्यान न्या. अभय ओक व न्या. रेवती मोहिते ढेरे यांनी हा इशारा दिला. या संदर्भातील माहिती देण्यासाठी त्यांनी महापालिकेला ३१ ऑगस्टपर्यंत मुदतही दिली.

पुणे महापालिका शहरातील कचऱ्याचे व्यवस्थापन नियमानुसार करत नाही. कचरा वाटेल तिथे फेकला जातो. त्यामुळे दुर्गंधी पसरून नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आले आहे, असा अर्जदारांचा दावा आहे. याच विषयावर पुण्यातील 'नागरिक चेतना मंच' या समाजसेवी संघटनेनेही याचिकेत बाजू मांडण्यासाठी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. संस्थेचे अध्यक्ष एस. सी. एन. जठार यांनी या प्रतिज्ञापत्रात महापालिकेच्या कचरा व्यवस्थापन पद्धतीवर टीका केली आहे. मुळात कचऱ्याचे वर्गीकरणच होत नाही, त्यापोटी दंड तर आकारला जात नाहीच; पण तरीही कचरा उचलण्याचे किंवा वर्गीकरणाचे काम करणाऱ्या खासगी कंपन्यांना 'टिपिंग फी' दिली जाते, असाही त्यांचा दावा आहे. हा गंभीर प्रकार असून याबाबत कृती करण्याची गरज आहे, असे मत न्यायालयाने व्यक्त केले.

उच्च न्यायालयाच्या यापूर्वीच्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापन नियमावलीचे पालन करणे सर्व महापालिकांवर पान ८ वर ▶

### मंचाच्या प्रतिज्ञापत्रातील मुद्दे

- **कचरा व्यवस्थापन प्रकल्पांना कायद्यानुसार मंजुरी नाही.**
- **कचऱ्याचे मुळात वर्गीकरणच होत नाही. त्याचा फायदा कंत्राटदारांना होतो.**
- **कचरा वाहतुकीतून महापालिकेला उत्पन्न मिळत नाही.**
- **महसूल देणाऱ्या सेवांचे खासगीकरण झाले आहे.**
- **पुनर्वापराच्या बाबी विकण्यास कंत्राटदारांना परवानगी. तरीही ते पालिकेकडून 'टिपिंग फी' उकळतात.**
- **कचरावेचकांचा उदरनिर्वाह धोक्यात.**
- **'रोकेम'तर्फे अजूनही कचऱ्यापासून वीजनिर्मिती नाही.**

### पुण्यातील बांधकामांवर बंदी घालण्याचा इशारा

**▶ पान १ वरून**

बंधनकारक आहे. पुणे महापालिका ही नियमावली पाळते आहे का, असे खंडपीठाने विचारले. घनकचरा व्यवस्थापन नियमांबाबत आमच्याकडे राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मान्यता प्रमाणपत्र आहे; तसेच ही नियमावली आम्ही पाळतो, असे महापालिकेचे वकील अभिजित कुलकर्णी म्हणाले. त्यावर मान्यता प्रमाणपत्र असणे वेगळे आणि कचऱ्याचे वर्गीकरण करणे वेगळे, असे खंडपीठ म्हणाले. हे वर्गीकरण होते का, असाही प्रश्न खंडपीठाने विचारला, त्यावर आपण माहिती घेऊ, असे कुलकर्णी म्हणाले.

न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यासाठी मुंबई वगळता कोणत्याही महापालिकेने मुदतवाढ मागितलेली नाही. तसेच या आदेशाचे पालन होत असल्याबाबत सरकारनेही अहवाल दिलेला नाही. त्यामुळे सर्वच महापालिकांनी हे प्रकरण गांभीर्याने घ्यावे; अन्यथा कल्याण-डोंबिवलीप्रमाणे पुण्यातील बांधकामांवरही बंदी घालावी लागेल, असा इशारा खंडपीठाने दिला.